
Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052 (UIF) Volume - 5 | Issue - 7 | Jan - 2016



# महात्मा फुलेंचे शेती विषयक विचार

डॉ. प्रविणा नागपूरकर
मराठी विभाग, महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर.



महात्मा ज्योतीराव फुले आधुनिक महाराष्ट्रातील महान समाजचितक होते. महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे ते अग्रदूत होते. त्यांनी ते आपले संपूर्ण आयुष्य शुद्र अतिशुद्र, शेतकरी, स्त्रीया यांच्या मनात स्वाभिमान आणि आत्मसन्मानाची भावना निर्माण करण्यासाठी वेचले. शेतकरी, मजुर, स्त्रीया आणि शुद्र अतिशुद्रांना आपले अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी जीवनभर संघर्ष केला.शेतकऱ्यांच्या हितासाठी, प्रगतीसाठी, उन्नतीसाठी, महात्मा फुले यांनी अत्यंत महत्वाचे कार्य केले. महात्मा ज्योतीराव फुले यांनी शेती सुधारणेबाबत मांडलेले विचार लक्षात घेऊन भारत सरकारने त्यानुसार शेतकरी हिताचे धोरण प्रभावीपणे राबविले असते तर आज देशातील शेतकऱ्यांची दुरावस्था झाली नसती. महात्मा ज्योतीराव फुले यांनी कृषी सुधारणेसाठी मांडलेले विचार त्याकाळातही आणि आजही कृषीसुधाणेच्या दृष्टिने महत्वाचे असे आहेत.समाजातील प्रत्येक व्यक्तिच्या दैनंदिन जीवनात शेतीचा सहभाग असतो. व्यक्तीच्या दैनिक जीवनातील आवश्यक अशा विविध वस्तूंची पूर्तता शेतीतून होत असते मग व्यक्ति हा ग्रामीण भागातील असो वा शहरी भागातील सकाळपासून तर रात्री झोपेपर्यंत अनेक आवश्यक अशा वस्तूचा पुरवठा शेतीतून होत असतो व्यक्तीप्रमाणे समाज व राष्ट्राच्या जीवनातही शेतीचे महत्वपूर्ण स्थान आहे भारतासारख्या कृषीप्रधान देशात तर राष्ट्र विकासाच्या दृष्टिने शेतीचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. भारतात प्राचीन व मध्ययुगीन काळात किंवा १९ व्या २० व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत जमीन महसूल हे राष्ट्राच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते देशातील सर्व लोकांच्या अनधान्याची गरज शेतीद्वारे पूर्ण होत असे.मानवी जीवनातील व राष्ट्राच्या विकासातील शेतीचे महत्व लक्षात घेऊन महात्मा फुले यांनी शेती व समाजाच्या विकासाच्या दृष्टिने मांडलेले विचार त्याकाळात आणि आजच्या काळातही महत्वाचे आहेत. राष्ट्रविकासाच्या दृष्टिने महत्वाचा घटक असलेल्या शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारे, लढा देणारे ज्योतीराव फुले हे महाराष्ट्रतीलच नव्हे तर भारतातील पहिले समाजसुधारक होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने अनेक विचार मांडले.

ज्योतीरावांच्या मते, भारतीय समाजात सर्वाधिक महत्व असलेल्या शेतकऱ्याला हिंदु समाज-व्यवसथेत निम्न दर्जा दिला गेलेला आहे. उच्च वर्गातील लोक अन्नदाता शेतकऱ्याला शुद्र समजतात, त्यांचा अपमान करतात. त्यांचे शोषणही करतात. कारण उपवर्गीय लोक हे जाणतात की, शेतकऱ्याला लाचार बनविल्याशिवाय विषमतेवर आधारीत समाजव्यवस्था कायम ठेवू शकणार नाही इंग्रजांच्या आगमनाच्या आधी भारतीय शेतकरी जितका गरीब होता तितकाच गरीब इंग्रजांच्या आगमनानंतरही होता. काही अंशी इंग्रजांच्या आगमनानंतर शेतकऱ्यांची प्रगती झाली असली तरीही मूलत जे परिवर्तन होणे आवश्यक होते ते झाले नाही. वास्तविक कृषी क्रांतीसाठी जमीनदारी पद्धती समाप्त होणे, उत्पन्नाचा मोठा भाग

**शेतकऱ्यांना मिळणे आणि त्यासाठी आधुनिक वैज्ञानिक पद्धतीने शेती करणे या तीन गोष्टी आवश्यक होत्या. मात्र इंग्रज काळात या तीन गोष्टी झाल्या नाही. त्यामुळे इंग्रजकाळातही शेतकरी गरीब व मागास राहीला. ज्योतीराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यासाठी जबाबदार तीन प्रमुख कारणे सांगितली. एक सर्वात महत्वाचे म्हणजे शेतीवरील जनसंख्येचा वाढता बोझा, दुसरे पुरोहित वर्ग, जमीनदार, शासक व त्यांच्या अधिकाऱ्यादवारा शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि तिसरे म्हणजे कृषी उत्पादन प्रणालीचे मागासलेपण व दुस्थिती.'**

**ज्योतीराव महराष्ट्रात घडणारे शेतीव्यवस्थेमधील स्थित्यंतर जवळून पाहात होते. शेतकऱ्यांचे वाढते दारिद्र्य, भुकेकंगालांच्या हालअपेष्टा यांनी त्यांचे काळीज हेलावत होते. पुरोहितशाही, सावकारशाही व सरकारी नोकरशाही यांनी चालवलेल्या शेतकऱ्यांच्या शोषणाविरूद्ध लढाई सुरू केली. शेतकऱ्यांचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत असतांना अज्ञानी, धर्मभोळ्या, दारिद्री शेतकऱ्यांची बाजू मांडण्यासाठी ज्योतीरावांनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' हा मौलिक ग्रंथ लिहिला.' या ग्रंथाचे गावोगावी सार्वजनिक वाचन झाले ज्योतीरावांचा विचार गावोगावी पसरू लागला.**

**शेतकऱ्यांच्या दास्यमुक्तीसाठी शेतीव्यवस्थेत मूलगामी बदल करण्याची भूमिका ज्योतीरावांनी घेतली. शेतीसाठीच्या पायाभूत सोयींचा विस्तार करण्यासाठीही त्यांनी विविध सूचना केल्या. शेतकऱ्याना सिंचनाच्या दृष्टिने पाणी उपलब्ध करून देण्यावर ज्योतिरावांनी विशेष भर दिला. शेतीसाठी शेतकऱ्याला पाणी दिल्या गेल्यास शेतकरी साधारण, खडकाळ जमीनीवरही उत्पन्न घेऊन आपले वैभव वाढवू शकतो. त्यामुळे ज्याठिकाणी पाणी उपलब्ध आहे, त्याठिकाणी बांध, धरणे बांधून, तळी व विहिरी खोदून शेतकऱ्यांना पाणी उलब्ध करून दिले पाहिजे. स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारे पाणी पुरेसे नसल्याने नद्यांवर मोठ-मोठी धरणे बांधून शेतकऱ्यांना कालव्याने पाणीपुरवठा करावा. डोंगरावरील गवत पालापाचोळा, मेलेले कीटक, श्वापद यांच्यापासून तयार झालेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणुन ठिकठिकाणी बांधे घालावेत त्यामुळे जमीन सुपीक होईल. शेतकऱ्यांनी जमीनीची धूप थांबविण्यासाठी प्रयत्न करावे. सरकारने शेतकाऱ्यांना अत्यंत कमी दरात पाणी पुरवठा करावा. सिंचन विभागातील भ्रष्ट्राचार व बेजबाबदार वृत्तीला आळा घालून शेतकऱ्यांना नियमीत पाणीपुरवठा करावा.' शेतकऱ्यांसाठी, शेतीविकासासाठी अशा अनेक उपयोगी सूचना ज्योतीबांनी केल्या. शेतीला पाणी पुरवठा करण्यासंदर्भात आणि सिंचन खात्यातील भ्रष्ट्राचाराबाबत ज्योतीरावांनी १२५ वर्षापूर्वी केलेल्या सूचना शेती व शेतविकासाच्या दृष्टीने किती महत्वाच्या होत्या हे आजच्या शेतीचे व शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे चित्र पहता लक्षात येते. आधुनिक तंत्राने शेती केल्याशिवाय शेती उत्पादन वाढणार नाही हे लक्षात घेऊन ज्योतीरावांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्र अवगत करून देण्यासाठी सरकारने खास प्रयत्न करण्याची सूचना केली. पुणे नगरपरिषदेत 'शेतकी कॉलेज' काढण्याच्या सूचनेत ज्योतीरावांचा पुढाकार होता. सरकारने शेतकी शाळा काढाव्यात, शिक्षण श्रमप्रधान करून, शेती विषयक प्रदर्शन भरवून, शेतकऱ्यांच्या मुलांनाही शिक्षणासाठी विदेशी पाठवून, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना आखून शेती सुधारणेचा विस्तार करावा अशी कळकळीची विनंती ज्योतीरावांनी केली. शेतीव्यवसायाला पूरक पातळीवर गाई म्हशींची शेळ्यामेंढयाची उत्तम पैदास करणारी बेणी आणावीत अशी सूचना देखील त्यांनी केली. सेंद्रिय कचऱ्यातून तयार होणारे खत, नदीमधील गाळ याची शेतकऱ्याना उपलब्धता करून द्यावी. शेतीला नुकसान होणारे वर्तन जर सरकारी अधिकाऱ्यांकडून घडले तर त्याला शिक्षा करावी, असे विचार ज्योतीरावांनी मांडले.शेतकऱ्यांना कमी व्याजदाराने सरकारने कर्ज द्यावे. उत्तम बि-बियाणे, शेतीची आधुनिक अवजारे यांचा कमी दरात पुरवठा करावा वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्याच्या पिकांचे संरक्षण करावे, शेती मालांचे प्रदर्शन भरवून शेतकऱ्यांना पुरस्कार द्यावे विदेशातील कृषी विद्यापीठे पाहण्यासाठी भारतीय शेतकऱ्यांना पाठवावे, भारतात कृषी विद्यापीठे स्थापन करावे, अशा सूचना ज्योतीबांनी केल्या. ज्योतीबांच्या सूचनेनुसार आज भारतात बऱ्याच गोष्टी करण्यात आल्या परंतु त्याच्या योग्य अंमलबजावणी अभावी शेती विकास खुंटला आहे.**

**ज्योतीराव केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते त्यामुळे त्यांनी स्वत: शेती सुधारणेचे प्रयोगही केले. पुण्यातील मुळामुठेचे धरण बांधून झाल्यावर अज्ञान व गैरसमजामुळे शेतकरी कालव्याचे पाणी घ्यायला तयार नव्हते, तेव्हा ज्योतीरावानी स्वत: पाटाच्या पाण्यावर पीक घेतले, ज्योतीरावांच्या शेतातील बहरलेली पिके पाहून परिसरातील शेतकऱ्यांनी कालव्याचे पाणी घ्यायला सुरुवात केली . विदेशी भाज्या, फुले, फळे लावण्याबाबतही लोकांमध्ये गैरसमज होता. ज्योतीरावांनी विदेशी वाणांची लागवड करून शेतकऱ्यांना धडा घालून दिला. शेतकऱ्यांना नगदी मोबदला उभी करून देणारी पिकांची लागवड स्वतच्या शेतीत करून शेतकऱ्यांचे प्रबोधन केले. शेतीमालाबाबत विविध प्रयोग**

केल्यावर शेतकऱ्यांना त्याचा अधिक फायदा होईल ही बाब प्रयोगातून सिद्ध करून दाखविली, २५ एकर ऊस लावून त्यांनी हजारो रूपयांचा गुळ तयार करून विकला. त्यामुळे महाराष्ट्रात उसाचे क्षेत्र वाढले. प्रयोगशील शेती विकासाची अपेक्षित फळ आपल्या विचार व कृतीमधून सातत्याने दाखवत राहिले. महात्मा फुलेंचे शेतीविकाससंबंधीचे विचार संपूर्ण समाज तथा राष्ट्राच्या हिताचेच होते.नव्हे ते संपूर्ण मानवजातीच्या सर्वांगीण विकासाचे विचार होते. भूमीपुत्राच्या विकासाशिवाय कृषीप्रधान देशाचा विकास होणार नाही. म्हणून भूमीपुत्राचा म्हणजेच शेतकऱ्याचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे असे महात्मा फुल्यांना सातत्याने वाटत होते. फुल्यांचे हे विचार १२५ वर्षांपूर्वी जेवढे महत्वाचे होते तेवढेच आजही महत्वाचे आहे. महात्मा फुलेंनी १२५ वर्षापूर्वी शेती विकासासाठी केलेल्या उपयुक्त सूचना आजही महत्वपूर्ण अशा आहे म. फुलेंच्या काळातील शेतकऱ्यांपेक्षाही जास्त वाईट स्थिती आजच्या शेतकऱ्यांची आहे. आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहेत. शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात होत असलेली दुरावस्था थांबवायची असल्यास महात्मा फुलेंच्या शेती विकासाविषयीचे विचार प्रभावीपणे अंमलात आणणे गरजेचे आहे, म्हणून महात्मा फुलेंचा शेती विकासाचा विचार आजच्या काळाजी गरज आहे.

## संदर्भ सूची :-


१) मुरलीधर जगताप, युगपुरूष महत्मा फुले, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९३, पृ. १४१ कित्ता, पृ. १४२

२) उमेश बगाडे, महात्मा ज्योतीराव फुले, महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला संच, गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. ९८, ९९. कित्ता, १०७ अशोक चौसाळकर, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, मुरलीधर जगताप उपरोक्त, ४२, ४३.

३) कीर धनंजय ,मालशे ,डॉ . स. ग. फडके ,डॉ. य. दि.(संपादक)'महात्मा फुले 'समग्र वाङ्मय ,प्रकाशक -महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई ,नोव्हेंबर 1991. .

४) उमेश बगाडे उपरोक्त, १०७, १०८, अशोक चौसाळकर उपरोक्त, ३५, ३६

५) मुरलीधर जगताप उपरोक्त, १४३, १४४. उमेश बगाडे उपरोक्त, १०८. सीताराम रायकर, आम्ही पाहिलेले फुले, ज्योतिराव फुले समता प्रष्ठाण, १९८१, ११-१४.